# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 22/09/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत १० किमी अंतरावर जुनी कामठी येथील महादेवाचे मंदीरासमोरील दिनांक २१/०९/२०२३ चे १३.०५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, नमुद घटनास्थळी अरविंद बखाराम नागोसे रा. आरीफ अंसारी यांचे शेतात रा. जुनी कामठी या नावाचा इसम हा जुनी कामठी येथील महादेवाचे मंदीरासमोर सार्वजनीक जागेत आपले हातात लोखंडी कोयता घेवून धुमधाम करून जोराजोरात शिवीगाळ करीत आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ तेथे पोहचल्यावर तेथे तो इसम धुमधाम करीत असल्याचे दिसुन आल्याने त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव अरविंद बखारामजी नागोसे वय ४७ वर्ष रा. पारडशिंगा ह. मु आरीफ अंसारी रा. कामठी यांचे शेतात असे सांगीतले इसमाजवळ लोखंडी पाते असलेला कोयता विनापरवाना अवैध्यरित्या मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— सफौ सुर्यभान जळते ब नं १३५ पोलीस स्टेशन कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुर्यभान जळते, पोलीस स्टेशन कन्हान मो. क्र. ९६७३८३७००७ हे करीत आहेत.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. खापा** :— दिनांक २१/०९/२०२३ चे १०.३० वा. सुमारास पो.स्टे. खापा हद्दीत फिर्यादी यांनी पोस्टेला येवून तोंडी रिपोर्ट दिली की, त्यांची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष ही दिनांक २१/०९/२०२३ रोजीचे सकाळी १०/३० वा. शाळेत जाते म्हणुन शाळेत न जाता तिला कोण्त्यातरी अज्ञात इसमाने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गेडाम या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**